**रे.मु.क्र. ७३/२०२२**
**सुशिलाबाई वि. सरलबाई व इतर**
**C.N.R.No.MHJG070007512022**

# अर्ज निशाणी २२ वरील आदेश

१. वादीने पस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन आहे की, वादीने सदरचा दावा मौजे कनाशि येथील गट क्र.२७७ क्षेत्रफळ ०.२३ आर मधील मिळकतीचे दि. १६/०३/२०२१ रोजी करुन दिलेले दस्त क्र.९६९ चे खरेदीखत रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात अनेक तांत्रिक स्वरुपाच्या अडचणीमुळे व टंकलेखन चुकीमुळे खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

१. दावा हा खरेदीखत रद्द होवुन मिळावा ''दाव्यात खरेदीखत रद्द होवुन दावा मिळकतीचा कब्जा मिळावा'' अशी दुरुस्ती.

२. दाव्यात नमुद केलेल्या दावा कलम १ नंतर नविन कलम १अ असा पॅरा निर्माण करुन त्यात

*''१/अ –मौजे कनाशी, ता.भडगाव, जि.जळगाव येथील शेत गट क्र. २७७ क्षेत्र ० हे. २३ आर, आकार १ रु.७५पैस –*

*चतु:सिमा :–*

*पूर्वेस बाजुस – आबा महादु बाविस्कर यांचे शेत*

*पश्चिम बाजुस – वसंत श्रीधर मोरे*

*दक्षिण बाजुस – लोण पिराचे रस्ता*

*उत्तर बाजुस – युवराज कौतिक सरदार यांचे शेत''*

असा मजुकर नमुद करावा.

३. तसेच २अ मध्ये नविन पॅरा घालुन त्याखाली खालील मजकुर नमुद करावा.

*''आबा महादु बाविस्कर हे वादीचे पती आहेत. प्र.वादी नं. १ व २ हे चुलत भाउ व चुलत साडुचा मुलगा व सुनबाई आहेत. आबा महादु बाविस्कर*

*हयांना पॅरालिसीस (अर्धांगवायु) चा आजार होता त्यावेळी वादीला पतीचे उपचारासाठी पैशांची अत्यंत गरज होती म्हणुन वादीने पैशांची मागणी प्र.वादी क्र.१ व २ कडे केली. प्र.वादी नं. १ व २ वादीला म्हणाली मी पैसे देते तुम्हास परंतु तुम्ही मला तुमचे शेत हे कायम खरेदीने खरेदीखत करुन नोंदवुन द्यावे लागेल. तुम्ही जर पैसे परत केले तर मी तुम्हाला खरेदीखत परतुन देईन.*

*वादी प्र.वादी क्र.१ व २ कडे रक्कम रु.१,३१,०००/— घेवुन गेले त्यावेळी प्र.वादी नं.१ व २ यांनी उत्तर दिले आता आम्ही मालक झालो आहे. तुम्ही पुन्हा आले तर जिवे ठार करु अशी धमकी वादीस दिली.''*

म्हणुन सदरचा मजकुर नव्याने समाविष्ठ करण्यात यावा.

४. तसेच पॅरा नं. १० विनंती कॉलम अ नंतर पुढील मजकुर घ ालण्यात यावा

*''२/अ —मौजे कनाशी, ता.भडगाव, जि.जळगाव येथील शेत गट क्र.२७७ क्षेत्र ० हे. २३ आर, आकार १ रु.७५पैस जिरायत जमीन प्र. वादी नं.१ व २ यांनी वादीच्या अडाणी, अज्ञान आर्थिक मजबुरीचा गैरफायदा घेवुन दि.१६/०३/२०२१ रोजी दस्त नोंदणी नं.९६९/२०२१ दुयम निबंधक भडगाव येथे नोंदणी केलेले खरेदीखत रद्द बातल होवुन मिळावे व सदर शेताचा कब्जा प्र.वादी नं.१ व २ कडुन वादीस द्यावा हि विनंती''*

वादीचे पुढील कथन असे आहे की, सदरची दुरुस्ती दाव्यात न झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल व वादी हा न्यायापासुन वंचित राहील. तसेच सदर दुरुस्ती अर्ज मंजुर झााल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी वादीने वर नमुद प्रमाणे दुरुस्तीची मागणी केलेली आहे.

३. याउलट प्रतिवादींनी त्यांचा खुलासा नि.क्र.२४ वर दाखल केला आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, वादीने सरचा अर्ज खोटा, लबाडीचा व न्यायालयाची दिशाभुल करण्यासाठी दाखल केला ाहे. या स्अेजला वादीस असा अर्ज दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच सदरची दुरुस्ती दाव्यावर परीणाम करणारी आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीचा अर्ज प्रतिवादीला १०,०००/— कॉस्टसह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४.  दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

५.  वादीने अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुर्नवाच्यता केली आहे.

६.  वादीने प्रस्तुतचा दावा खरेदीखत रद्द होवुन तिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या तत्थकथनावरुन व अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, वादी ही अडाणी व अशिक्षीत असल्यामुळे तसेच तांत्रीक व टंकलिखीत चुकीमुळे सदरची चुक झाली आहे. सदर दुरुस्ती अन्वये प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच, प्रस्तुत दाव्याचे स्वरुप देखील बदलनार नसुन दावा पुर्णपणे गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी व न्यायाच्या दृष्टीने सदर दुरुस्ती आवश्यक असलयाचे दिसते.

७.  तथापि, वादीस दावा दाखल करताना सुचवलेलल्या दुरुस्ती मधील तथ्य कथने माहीत होती व सदरच्या बाबी दावा दाखल झाल्यानंतर उपस्थीत झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत प्रतिवादी वादीकडुन निश्चीतच काही प्रमाणात खर्च मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज खर्च रु.३००/— प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यत करण्यात यावी.

स्वा/—

**( श्रीमती.व्ही.एस.मोरे )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भडगांव**

**दिनांक : २५/११/२०२४**